|| अंतरी पेटवू ज्ञानज्योत ||

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव

Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon



परीक्षा गोपनिय उत्तरार्ध विभाग

विद्यापीठाच्या उन्हाळी तसेच हिवाळी परीक्षांमध्ये उत्तरपत्रिका बंडल संदर्भात आढळून येणाऱ्या त्रुटींची तपासणी करून आवश्यक कार्यवाही व शिफारशी करण्यासाठी गठित समितीच्या अहवालानुसार कार्यवाही करण्याबाबत.

परिपत्रक क्र. ७१ /२०२६

संदर्भ :- परीक्षा व मूल्यमापन मंडळाचा ठराव क्र. प.मू.मं. २५/२०२६, दि. १६/१०/२०२६.

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने कळविण्यात येते की, विद्यापीठाच्या उन्हाळी तसेच हिवाळी परीक्षांमध्ये उत्तरपत्रिका बंडल संदर्भात आढळून येणाऱ्या त्रुटींची तपासणी करून आवश्यक कार्यवाही व शिफारशी करण्यासाठी गठित समितीने सादर केलेल्या अहवालास परीक्षा व मूल्यमापन मंडळाने मान्यता दिलेली आहे. त्यानुसार परीक्षेच्या कामकाजामध्ये पारदर्शकता, अचूकता व शिस्त राखण्यासाठी खालीलप्रमाणे त्रुटी व त्यावरील दंडात्मक कार्यवाही निश्चित करण्यात आलेली आहे.

१) **JSR अहवालावर व उत्तरपत्रिकेवर चुकीचा बैठक क्रमांक व चुकीची माहिती नमूद करणे :**

➡ JSR अहवालावर व उत्तरपत्रिकेवर चुकीचा बैठक क्रमांक आणि चुकीची माहिती आढळल्यास संबंधित विद्यार्थ्यास **रु. १००/-** तसेच कनिष्ठ पर्यवेक्षक यांना **रु. २००/-** दंड आकारण्यात येईल.

२) **कॉपी केस मधील उत्तरपत्रिका व आवश्यक कागदपत्रे विहित मुदतीत न पाठविणे :**

➡ कॉपी प्रकरणामध्ये संबंधित विद्यार्थ्याची उत्तरपत्रिका आवश्यक कागदपत्रांसह १० दिवसांच्या आत विद्यापीठाकडे पाठविणे बंधनकारक राहील. अशा प्रकरणात विद्यापीठ परीक्षा वाहन परीक्षा केंद्रावर उशीरा गेल्यास किंवा त्यामार्गावर न गेल्यास सदर महाविद्यालयाने आपल्या जबाबदारीवर १० दिवसांच्या आत विद्यापीठाकडे न पाठविल्यास संबंधित महाविद्यालयास प्रति उत्तरपत्रिका **रु. १,०००/-** दंड आकारण्यात येईल.

३) **JSR अहवालातील माहितीमध्ये चुका असणे :**

➡ JSR अहवालावर अचूक संकेतांक (Unique Code) अथवा संगणक कोड (Computer Code) चुकीचा नमूद करणे, उत्तरपत्रिकांची संख्या चुकीची नमूद करणे किंवा JSR अहवाल चुकीचा भरणे इत्यादी बाबी निदर्शनास आल्यास संबंधित वरिष्ठ पर्यवेक्षक, वितरण लिपिक व संबंधित लिपिक यांच्या त्या दिवसाच्या पूर्ण मानधनात कपात करण्यात येईल.

४) **विद्यापीठाने दिलेल्या रॅपर नमुन्याचा वापर न करणे व अपूर्ण माहिती भरणे :**

➡ विद्यापीठाने विशेषतः दिलेल्या रॅपरच्या नमुन्याऐवजी इतर स्वरूपाचा रॅपर वापरल्यास संबंधित महाविद्यालयास **रु. ३००/-** दंड आकारण्यात येईल.

५) **परीक्षा कालावधीत चुकीची प्रश्नपत्रिका देणे :**

➡ परीक्षा कालावधीत विद्यार्थ्यांना चुकीची प्रश्नपत्रिका देण्यात आल्यास संबंधित वरिष्ठ पर्यवेक्षक, अंतर्गत कनिष्ठ पर्यवेक्षक तसेच संबंधित लिपिक यांना त्या दिवसाचे पूर्ण मानधन इतका दंड आकारण्यात येईल.

..२

६) **JSR अहवालाची ई-सुविधेनुसार दिलेली Soft Copy वापरात न आणणे :**

➡ JSR अहवालासाठी ई-सुविधेनुसार विद्यापीठाकडून देण्यात आलेली Soft Copy न वापरल्यास संबंधित महाविद्यालयास प्रति वर्ग **रु. २००/-** दंड आकारण्यात येईल.

७) **विद्यापीठाच्या पातळीवरील उत्तरपत्रिका महाविद्यालयाने तपासल्यास:**

➡ विद्यापीठ पातळीवरील विद्यार्थ्यांची उत्तरपत्रिका संबंधित महाविद्यालयाने परस्पर तपासल्यास संबंधित परीक्षक तसेच महाविद्यालयाचे केंद्रसंचालक यांना प्रति उत्तरपत्रिका अव्यावसायिक वर्गासाठी **रु. ५०/-** व व्यावसायिक वर्गासाठी **रु. १००/-** दंड आकारण्यात येईल.

८) **विद्यापीठाने निर्धारित केलेल्या उत्तरपत्रिकांच्या प्रकारांचा वापर न करणे :**

➡ विद्यापीठाने निर्धारित केलेल्या उत्तरपत्रिकांचे प्रकार, पदवी, पदव्युत्तर व पदविका अभ्यासक्रमांसाठी प्रश्नपत्रिकेच्या गुणांप्रमाणे वापरणे बंधनकारक राहील. त्यानुसार उत्तरपत्रिकांचे निर्धारित स्वरूप पुढीलप्रमाणे आहे.

- UG : ६० गुणांसाठी २८ पानी, ३० गुणांसाठी २० पानी उत्तरपत्रिका, ७५ गुण व ९० किंवा १०० गुणांसाठी ३६ पाने
- PG : ६० गुणांसाठी ३६ पानी, ३० गुणांसाठी २८ पानी उत्तरपत्रिका, ७५ गुण व ९० किंवा १०० गुणांसाठी ३६ पाने

वरीलप्रमाणे निर्धारित उत्तरपत्रिकांचा वापर न केल्यास संबंधित महाविद्यालयास **प्रति उत्तरपत्रिका रु. ५/- दंड** आकारण्यात येईल.

तरी सर्व संलग्नित महाविद्यालयांचे प्राचार्य, केंद्रसंचालक तसेच परीक्षा कामकाजाशी संबंधित सर्व अधिकारी व कर्मचारी यांनी वरील सूचनांची गांभीर्याने नोंद घ्यावी व विद्यापीठाच्या परीक्षा कामकाजात कोणत्याही प्रकारच्या त्रुटी होणार नाहीत याची दक्षता घ्यावी.

तसेच वरील सूचनांचे उल्लंघन झाल्यास संबंधितांवर नमूद केल्याप्रमाणे दंडात्मक कार्यवाही करण्यात येईल, याची सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी.

सदर परिपत्रकाची काटेकोरपणे अंमलबजावणी करण्यात यावी.

कळावे,

जा.क्र.कबचौउमवि/७-आय/3233/२०२६
दिनांक. ०२/११/२०२६

(प्रा. योगेश ना. पाटील)
संचालक,
परीक्षा व मूल्यमापन मंडळ

प्रति,
कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाशी संलग्न असलेल्या
सर्व महाविद्यालयांचे मा.प्राचार्य तसेच मान्यताप्राप्त परिसंस्थांचे मा.संचालक

<u>प्रत माहितीसाठी :</u>
१) मा.कुलगुरू महोदय, कबचौउमवि, जळगाव
२) मा.प्र-कुलगुरू महोदय, कबचौउमवि, जळगाव
३) उपकुलसचिव (विज्ञान व शिक्षणशास्त्र, तंत्रज्ञान, औषधीनिर्माण, आर्किटेक्चर, मानवविज्ञान आणि आंतरविद्याशाखीय अभ्यास विद्याशाखा), कबचौउमवि, जळगाव
४) उपकुलसचिव, परीक्षा व मूल्यमापन मंडळ (गोपनीय पूर्वाध, वाणिज्य व व्यवस्थापनशास्त्र विद्याशाखा, रेकॉर्ड, परीक्षा गैरप्रकार चौकशी, पदवीप्रदान विभाग), कबचौउमवि, जळगाव